# B.A. (Part–III) Examination
## MARATHI (Compulsory)
## (Modern Indian Languages)

वेळ : तीन तास] [एकूण गुण : 70

**सूचना :— सर्व** प्रश्न सोडविणे आवश्यक.

1. देश सुजलाम्, सुफलाम् होण्यासाठी कृषी आणि गृहउद्योग यांची बरोबर प्रगती व्हावी, असे पंढरीनाथ पाटील यांना का वाटते, ते लिहा.

**किंवा**

विदर्भाच्या इतिहाससंदर्भातील कोणती माहिती वि.भि. कोलते यांनी सांगितली आहे ? 12

2. वऱ्हाडी बोलींचे वैशिष्ट्ये 'वऱ्हाडी लोकभाषा' या पाठाच्या आधारे स्पष्ट करा.

**किंवा**

सुशिक्षित माणूस अंधश्रद्ध कसा बनत जातो, ते श्याममानव यांच्या विचारांच्या आधारे स्पष्ट करा. 8

3. 'म्हातारपणाचे फायदे' या पाठातील विनोदी प्रसंगांचे चित्रण करा.

**किंवा**

'घर' या कथेतील कुटुंबव्यवस्था उलगडून दाखवा. 12

4. 'अतिथी देवो भव!' कथेतील प्राणी-मात्रांविषयीचे प्रेम शब्दबद्ध करा.

**किंवा**

'प्रेम' या पाठात मारूती चितमपल्ली यांनी कोणते अनुभव कथन केले आहे ? 8

5. 'पयसाची लाल आग व्हय!' या कवितेतील आशय सौंदर्य स्पष्ट करा.

**किंवा**

जगण्याचे बदलते संदर्भ 'किल्ली' या कवितेतून कसे व्यक्त झाले, ते सांगा. 12

6. 'बिकट वाट वहिवाट' या कवितेतील समाज आणि संसार विषयक उपदेश स्पष्ट करा.

**किंवा**

नारायण सुर्वेंच्या कवितेतील सखी आयुष्य जगण्यासाठी आपल्या सख्याला कसा धीर देत आहे ? 8

7. (अ) सुनिता बहुउद्देशीय संस्था, ३१६, म.फुले सोसायटी, वाघापूर रोड, यवतमाळ अंतर्गत 'शिलाई प्रशिक्षण' घेण्याकरिता इच्छूक उमेदवारांकडून अर्जमागविण्यात येत आहे, अशी जाहिरात द्या.

**किंवा**

इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ येथे 'माजी विद्यार्थी मेळावा' संपन्न झाला, या आशयाची बातमी लिहा. 5

139

(ब) खालील उताऱ्यावरील विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे द्या :

'ग्यानबा-तुकाराम' हा एक प्रकारचा मध्यम पद लोपी समास आहे. म्हणजे ह्यात भागवत-धर्माच्या सर्व साधु-संतांचा समावेश आहे. थोडक्यात दोघांचा उच्चार केला आहे. ज्ञानोबा आचार्य आणि तुकोबा प्रचारक. तुकाराम महाराजांचे अभंग सर्वांच्याच तोंडी बसून गेले आहेत. महाराष्ट्रात ज्ञानाचा सार्वत्रिक प्रसार तुकोबां इतका कोणीच केला नाही. ज्ञानोबांनी ज्ञानाचे भांडार भरून ठेवलें. तुकोबांनी हमाली पत्करून तें 'भांडार फोडलें' आणि 'धन्याचा माल' गरीब गुरिबांपर्यंत पोंचविला. म्हणून महाराष्ट्रातली जनता कृतज्ञतापूर्वक ह्या दोघांच्या नांवाचा जयजयकार करीत असते.

(1) 'ग्यानबा-तुकाराम' हा कोणता समास आहे ?

(2) ज्ञानोबा आणि तुकोबा काय काय होते ?

(3) ज्ञानाचे भांडार कोणी भरून ठेवलें ?

(4) गोरगरिबांपर्यंत तुकोबांनी काय पोहच विले ?

(5) महाराष्ट्रातली जनता कृतज्ञतापूर्वक काय करते ?

**किंवा**

वरील उताऱ्याचा एक-तृतीयांश सारांश लिहा. 5

139 139 139 139 139